महाराष्ट्र शासन
सहआयुक्त तथा उपाध्यक्ष,
अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती,
कोकण विभाग, ठाणे, वर्तक नगर प्रभाग समिती कार्यालय, 3 रा मजला,
वेदांत संकुल, कोरस कंपनी समोर, वर्तकनगर, ठाणे (प), 400 606.
दुरध्वनी-०२२/२५८८३५०३ E-mail-tcsctha.mah@nic.in

**कंत्राटी पदे भरणेसाठीची निवड समिती, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, कोकण विभाग, ठाणे.**

## कंत्राटी तत्वावर विविध पदे 3 महिन्यांच्या कराराने नियुक्तीसाठी जाहिरात, सन - 2020
## (जाहिरात क्रमांक २/2020)

महाराष्ट्र शासन, आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक :एसटीसी-2019/प्र.क्र.34/का.10 मंत्रालय, मुंबई दिनांक 13 सप्टेंबर, 2019 अन्वये पालघर येथे नवीन अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीची स्थापना करण्यास व पालघर समितीला सहाय्य करण्यासाठी काही पदे कंत्राटी तत्वावर भरण्यास शासनाकडून मंजूरी देण्यात आलेली आहे. खालील तक्यात नमूद केलेली पदे कंत्राटी तत्वावर 3 महिन्याच्या कराराने भरण्यासाठी अर्हताधारक पात्र उमेदवारांकडून दिनांक २४ जानेवारी, २०20 रोजी सकाळी १०.०० वाजेपासून ते अंतिम मुदत दिनांक 3 फेब्रुवारी, २०20 रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत **अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, ठाणे** या कार्यालयास पोहचतील अशा पध्दतीने रजिस्टर पोस्टाने / स्पीड पोस्टाने / स्वहस्ते सोबतच्या नमुन्याप्रमाणे अर्ज मागविण्यात येत आहेत. दिनांक 3 फेब्रुवारी, २०20, रोजी सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत या अंतिम मुदतीनंतर प्राप्त होणा-या अर्जांचा विचार केला जाणार नाही.

**सदरची जाहिरात व अर्जाचा नमुना http://thane.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.**

**दिनांक 05/01/2020 रोजी महाराष्ट्र टाईम्स या वृत्तपत्रात प्रसिध्द केलेली अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, पालघर साठी कंत्राटी तत्वावर विविध पदे भरण्याची जाहिरात रद्द करण्यात येत आहे. तथापि सदर जाहिरातीच्या अनुषंगाने ज्या उमेदवारांनी विहित नमुन्यात अर्ज सादर केलेले आहेत, असे अर्ज या जाहिराती मधील अटी, शर्ती, शैक्षणिक पात्रता, वयोमर्यादा व अन्य बाबी पात्र असतील अशा उमेदवारांना पुन्हा अर्ज करण्याची आवश्यकता नाही.**

| अ. क्र. | पदनाम | आवश्यक शैक्षणिक पात्रता, अनुभव, प्राधान्यक्रम | प्रती महा मानधन | पदसंख्या |
|---|---|---|---|---|
| 1 | विधी अधिकारी | एल.एल.बी., MSCIT सह संगणकावर इंग्रजी व मराठी भाषेत कामकाज करण्याची योग्यता अनिवार्य, एल.एल.एम. असल्यास/समितीच्या कामाचा/शासकीय कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य | 40,000 | 1 |
| 2 | कनिष्ठ प्रशासकीय अधिकारी | मान्यता प्राप्त विद्यापिठातील कोणत्याही शाखेतील पदवीधर, प्रशासकिय कामाचा अनुभव/शासकिय सेवानिवृत्त कर्मचाऱ्यास प्राधान्य | 30,000 | 1 |
| 3 | संशोधन सहाय्यक | मान्यता प्राप्त विद्यापिठातील कोणत्याही शाखेतील पदवीधर, MSCIT सह संगणकावर मराठी व इंग्रजी टंकलेखनाचे ज्ञान आवश्यक, प्रशासकिय कामाचा अनुभव / शासकीय सेवानिवृत्त कर्मचा-यास प्राधान्य | 30,000 | 1 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | माहिती तंत्रज्ञान तथा संगणक सहाय्यक | मान्यता प्राप्त विद्यापिठातील IT/Computer/Electronic and TeleCommunicationविषयातील B.E/B.Tech/MCA/पदवीधर, Hardware & Networking मधील कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य | 30,000 | 1 |
| ५ | लघुटंकलेखक | मान्यता प्राप्त विद्यापिठातील कोणत्याही शाखेतील पदवीधर, MSCIT, मराठी किंवा इंग्रजी लघुलेखनाची गती 100 श. प्र. मि., टंकलेखनाची गती मराठी 30 व इंग्रजी 40 प्रशासकिय कामाचा अनुभव/शासकिय सेवानिवृत्त कर्मचाऱ्यास प्राधान्य. | 25,000 | 1 |
| ६ | लिपीक टंकलेखक | मान्यता प्राप्त विद्यापिठातील कोणत्याही शाखेतील पदवीधर, MSCIT, टंकलेखनाची गती मराठी 30 व इंग्रजी 40 | 20,000 | 1 |
| ७ | शिपाई | महाराष्ट्र राज्य माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण | 12,000 | 1 |
| ८ | पहारेकरी | इयत्ता सातवी उत्तीर्ण / अनुत्तीर्ण | 8,000 | 2 |
| ९ | सफाईगार | इयत्ता सातवी उत्तीर्ण / अनुत्तीर्ण | 8,000 | 1 |

**२. वयोमर्यादा :-**

सर्वसाधारण उमेदवारांकरिता - दिनांक 01/0१/2020 रोजी उमेदवारांचे वय १9 वर्षापेक्षा कमी व 4३ वर्षापेक्षा जास्त नसावे. सेवानिवृत्त शासकीय कर्मचारी यांचेकरीता वयोमर्यादा ६५ वर्षापेक्षा जास्त नसावे. वयोमर्यादा शिथिल करणेचे अधिकार निवड समितीकडे आहेत.

**३. अर्ज करण्याची पध्दत व सूचना :-**

१. केवळ रजिस्टर पोस्टाने / स्पीड पोस्टाने अथवा स्वहस्ते दिनांक 2४ जानेवारी, २०20 रोजी सकाळी १०.०० वाजेपासून ते अंतिम मुदत दिनांक 3 फेब्रुवारी, २०20 रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत या कार्यालयास कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी व कार्यालयीन वेळेत प्राप्त होणा-या अर्जाचांच विचार करण्यांत येईल. विहित मुदतीनंतर प्राप्त अर्ज अपात्र ठरविण्यात येतील.
२. उमेदवारांचे अर्जासोबत शैक्षणिक व अन्य प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती जोडणे आवश्यक आहे. सदर प्रती वाचण्यायोग्य असाव्यात.
३. प्राप्त अर्जामधून शैक्षणिक व अनुभवाच्या गुणवत्तेनूसार छाननी करुन निवडक उच्च गुणवत्ताधारक उमेदवारांना दूरध्वनीव्दारे / भ्रमणध्वनीव्दारे /ई मेल व्दारे / रजिस्टर पोष्टाने मुलाखतीसाठी बोलावले जाईल. यास्तव उमेदवारांनी आपला दूरध्वनी क्रमांक / भ्रमणध्वनी क्रमांक / पत्ता पीनकोडसह अर्जामध्ये बिनचूक नमूद करावा.

**४. अटी व शर्ती**

१) उमेदवार हा महाराष्ट्रातील रहिवासी असावा. अर्जदाराने महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असल्याचे शासनाने प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिका-यांचे प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत सोबत जोडणे आवश्यक आहे.
२) उमेदवारांनी अर्जात माहिती भरतांना मुळ कागदपत्रावरुन बिनचुक माहिती भरावी. सदर पदासाठी आवश्यक असलेली शैक्षणीक व इतर अनुषंगीक पात्रता धारण केली असेल अशाच उमेदवारांच्या अर्जाचा विचार केला जाईल. आवश्यक पात्रता पूर्ण न करणा-या उमेदवारांचे अर्ज अपात्र ठरविण्यांत येतील.
३) मुलाखतीमध्ये प्राप्त गुणानूक्रमानुसार नियुक्तीस पात्र उमेदवारांनी त्यांचे मुळ शैक्षणिक व इतर कागदपत्र पडताळणीकरीता अंतरिम स्वरुपात यादी प्रसिध्द करण्यांत येईल. ज्या उमेदवारांची जाहिरातीनूसार आवश्यक पात्रता व अर्जात भरलेली माहिती व मुळ कागदपत्रांच्या तपासणीनंतर परिपूर्ण सिध्द होईल, अशा उमेदवारांचीच

निवड करण्यांत येईल.मुळ कागदपत्र पडताळणी करतेवेळी सदर कागदपत्रांमध्ये खोटी प्रमाणपत्र/असत्य अथवा चुकीची प्रमाणपत्र आढळल्यास त्यांच्याविरुध्द भा.द.वि.नुसार फौजदारी गुन्हा नोंदवून कारवाई करण्यांत येईल.

४) अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे मुलाखतीस/कागदपत्रे पडताळणीस बोलविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार विहित अर्हता धारण न करणारा आढळल्यास अथवा खोटी माहिती पुरविल्यास अथवा एखादया अर्जदाराने त्याच्या निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष/अप्रत्यक्षरित्या दबाव आणला अथवा गैर प्रकारचा अवलंब केल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्व सूचना न देता त्यांची नियुक्ती समाप्त करण्यांत येईल व त्यांच्या विरुध्द कायदेशीर कारवाई करण्यांत येईल.

५) निवड समितीकडून उमेदवारांची गुणवत्ता, संगणकीय ज्ञान, टंकलेखन परिक्षा, विहीत कामाचा अनुभव या आधारे तसेच मुलाखती द्वारे निवड करण्यात येईल. संगणकीय ज्ञान तसेच मराठी व इंग्रजी टंकलेखन, लघुटंकलेखन यांची चाचणी स्वतंत्रपणे घेण्यात येईल.

६) मुलाखतीसाठी पात्र उमेदवारांची यादी, कागदपत्रे तपासणी/छाननी व या संबंधित सूचना कार्यालयाच्या माहिती पटलावर/ **http://thane.gov.in** या संकेतस्थळावर दि.१७/02/2020 रोजी उपलब्ध करण्यात येतील.

७) पात्रता धारण न करणा-या उमेदवारांना भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र करणे, भरती प्रक्रिया रद्द करणे, पदांच्या एकूण संख्येमध्ये वाढ किंवा घट करणे, प्राप्त पात्र अर्जदारांपैकी उच्चतम गुणवत्तेच्या गुणानुक्रमानूसार मुलीखतीच्या प्रक्रियेसाठी पात्र ठरणा-या सर्व अथवा निवडक उमेदवारांस मुलाखतीस बोलाविणे याबाबतचे अधिकार तसेच भरती प्रक्रिये संदर्भात वाद, तक्रारी बाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार निवड समिती स्वत:कडे राखून ठेवत आहेत. त्याबाबत कोणताही दावा सांगता येणार नाही.

८) सदरची नियुक्ती अत्यंत तात्पुरत्या स्वरुपात पूर्णत: कंत्राटी पध्दतीने मानधन तत्वानुसार तीन महिने कालावधीकरिता व तदनंतर एक दिवसाचा सेवाखंड देवुन आवश्यकतेनुसार पुढील कालावधीसाठी करण्यात येईल.

९) निर्धारीत मानधनात वाढ करण्याची मागणी करता येणार नाही.

१०) कामकाज समाधानकारक नसल्यास कोणतीही पूर्व सूचना न देता सेवा तात्काळ समाप्त करण्यात येईल.

११) या नियुक्त उमेदवारांस शासकीय कर्मचारी म्हणून गणले जाणार नाही.

१२) कंत्राटी पदावर नियुक्ती करताना ही नियुक्ती नियमित करण्याची अथवा समायोजन करण्याची कोणतीही मागणी/विनंती मान्य केली जाणार नाही.

१३) कंत्राटी कर्मचा-यास कार्यालयातील अधिका-यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे कर्तव्य पार पाडावे लागेल. तसेच त्यांना अन्य नोकरी अथवा व्यवसाय करता येणार नाही.

१४) कामाप्रती निष्ठा व गोपनियता पाळण्याची हमी द्यावी लागेल / गोपनीयतेचा भंग करणा-यावर पोलीस कारवाई केली जाईल.

१५) चारि‍त्र्य पडताळणीअंती आक्षेपार्ह बाबी आढळुन आल्यास संबंधित उमेदवार नियुक्तीसाठी/सेवेसाठी पात्र राहणार नाही. तसेच कोणत्याही टप्प्यावर असे उमेदवार अपात्र ठरतील.

१६) निवड झालेल्या उमेदवारांना आवश्यक त्या सर्व प्रमाणपत्र/हमीपत्र इ. यांची पुर्तता करुन देणे बंधनकारक राहील.

१७) सामान्य प्रशासन विभागाकडील अधिसुचना क्र. एस आर व्ही 2000/प्र.क्र.17/2000/12, दि. २८ मार्च, 2005 व शासन परिपत्रक एसआरव्ही-2000/प्र.क्र.17/2000, दि. ०१ जुलै, २००५ अन्वये विहित केले नूसार लहान कुटूबाचे प्रमाणपत्र नमुना अ भरणे आवश्यक आहे.

१८) अर्ज सादर करतेवेळी, मुलाखतीस व कागदपत्र पडताळणीस उमेदवारांस स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

१९) वरील अटी व शर्ती, नियमाव्यतिरिक्त शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश व निर्णय लागू राहतील.

२०) सदर भरती प्रक्रियेसंदर्भात निवड समितीचा निर्णय अंतिम राहील.

२१) जाहिरातीमधील काही मुद्दे शासन निर्णयाच्या विसंगत असल्यास शासन निर्णय अंतिम राहील.

२२) पात्र/अपात्र उमेदवारांची यादी कार्यालयातील सूचना फलकावर / संकेतस्थळावर लावण्यांत येईल त्यासंबंधी स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही.

२३) उमेदवाराची निवड झाल्यानंतर रु. १००/- च्या बंधपत्रावर सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र.एसआरव्ही 201७/प्र.क्र.455/कार्या.1२,दिनांक 9 फेब्रुवारी, २०१८ मधील विवरणपत्र-ब प्रमाणे तसेच उपरोक्त <u>अटी व शर्ती</u> मान्य असल्याचा करारनामा करुन देणे बंधनकारक असेल.

**(रं. ह. किल्लेदार)**
**सहआयुक्त तथा उपाध्यक्ष**
**अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती**
**कोंकण विभाग, ठाणे**

**अर्जाचा नमूना पुढील पानावर**

पासपोर्ट साईज
फोटो

# अर्जाचा नमूना

प्रति,
सहआयुक्त तथा उपाध्यक्ष,
अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती,
कोंकण विभाग, ठाणे.

विषय:- अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, पालघर या कार्यालयातील
---------------------------------------------------या पदाकरिता अर्ज

1) उमेदवाराचे संपूर्ण नाव : ---------------------------------------------------
(आडनांव प्रथम)
2) जन्म तारीख ----------------- ---------------------- ------------
3) धर्म : ---------------------------------------------------
4) जात : ---------------------------------------------------
5) वय (दिनांक 01/0१/2020 रोजी ) :वर्ष-------------- महिने---------- दिवस -------------
6) वैवाहिक स्थिती :---------------------------------------------------
7) पत्र व्यवहाराचा संपूर्ण पत्ता :---------------------------------------------------
---------------------------------------------------
---------------------------------------------------
भ्रमणध्वनी क्र .----------------- दूरध्वनी क्र. ---------------
ई-मेल---------------------------------------------------
8) अर्जदाराचा कायमचा पत्ता :---------------------------------------------------
---------------------------------------------------
दूरध्वनी क्र. -------------------------------------------

9)शैक्षणिक अर्हता

| धारण केलेल्या शैक्षणिक अर्हतेचा तपशील | | बोर्ड/विद्यापीठाचे नाव | उत्तीर्ण वर्ष | एकुण गुण | मिळालेले गुण | टक्केवारी/ ग्रेड |
|---|---|---|---|---|---|---|
| SSC | | | | | | |
| HSC | | | | | | |
| Degree | | | | | | |
| PG | | | | | | |
| अतिरिक्त पात्रता | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

10) तांत्रिक अर्हता

| धारण केलेल्या तांत्रिक अर्हतेचा तपशील | | बोर्ड/विद्यापीठाचे नाव | उत्तीर्ण वर्ष | एकुण गुण | मिळालेले गुण | टक्केवारी/ ग्रेड |
|---|---|---|---|---|---|---|
| MSCIT | | | | | | |
| Typing | मराठी | | | | | |
| | English | | | | | |
| SHORTHAND | मराठी | | | | | |
| | English | | | | | |
| अतिरिक्त पात्रता | | | | | | |
| | | | | | | |

11) अनुभव

| अ.क्र | काम केलेल्या कार्यालयचे नाव व पत्ता | धारण केलेले पद | कालवधी | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | वर्ष | महिने | दिवस |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

मी, असे प्रमाणित करतो/करते की, आपले कार्यालयाकरिता............................................... पदाची जाहिरात मी काळजीपूर्वक वाचली असून सदर जाहिरातीमधील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत. अर्जासोबत अधिवास प्रमाणपत्र,शैक्षणिक व तांत्रिक अर्हता,अनुभव प्रमाणपत्र,आधारकार्ड इत्यादीच्या छायांकित प्रती साक्षांकीत करुन अर्जासोबत जोडलेल्या आहेत. सदर पद हे अत्यंत तात्पुरते असल्याची मला जाणीव आहे व स्थायीत्वाबाबत (Permanent) कोठेही दावा करणार नाही, किंवा न्यायालयात दाद मागणार नाही. वरील अर्जात दिलेली सर्व माहिती खरी असुन चुकीची वा खोटी आढळून आल्यास मी कायदेशीर कारवाईस पात्र राहीन.

ठिकाण :- उमेदवाराची स्वाक्षरी :------------------

दिनांक:- उमेदवाराचे पूर्ण नाव :------------------

-----------------------------------------------------------------------------------